**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे - ४११ ०१८.**

**(महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ कलम ३७ अन्वये फेरबदल)**

## सूचना

क्रमांकः नरवि।कावि।२क। ११ ।२०१०.

ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाची सूधारित विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसूचना क्र. टीपीएस - १८९३ / १४१३/ नवि - १३, दिनांक २८ नोव्हेंबर १९९५ अन्वये मंजूर असून महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग निर्णय क्र पीसीएम।१६९७।९३४।प्र.क्र.८९।नवि-२२, दि. १५ नोव्हेंबर १९९७ अन्वये पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे नियोजन नियंत्रणाखालील क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रणाखाली समाविष्ट करण्यात आले आहे. ( यापुढे "उक्त विकास योजना" म्हणून संबोधिलेली).

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेत मौजे- भोसरी येथील स.न. ९४, ९५ व ९६ मधील सुमारे ८.०० हेक्टर क्षेत्राची जमीन शेती विभागात समाविष्ट आहे. (यापुढे "उक्त जमीन" म्हणून निर्देशित केलेली.)

आणि ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मा. महापालिका सभा ठराव क्रमांकः ६६४ व ७५१ अन्वये अनुक्रमे दिनांकः ०३।०६।२००९ व दिनांकः २१।१२।२००९ व्दारे उक्त विकास योजनेतील उक्त जमीन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करुन शेती विभागातून वगळून निवासी विभागात समाविष्ट करण्यास मान्यता प्रदान केली आहे. (यापुढे "उक्त ठराव" म्हणून संबोधीत केलेला)

आणि ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने उक्त विकास योजनेतील उक्त जमीन उक्त ठरावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करुन शेती विभागातून वगळून निवासी विभागात समाविष्ट करण्याचे योजिले आहे. (यापुढे "उक्त फेरबदल" म्हणून संबोधीत केलेला)

आणि त्याअर्थी, उक्त फेरबदल दर्शविणारा नकाशा नागरिकांच्या अवलोकनार्थ उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-४११ ०१८. यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत अवलोकनार्थ ठेवण्यात आलेला आहे.

उक्त प्रस्तावित फेरबदलास कोणाच्या काही हरकती अगर सूचना असतील, त्या सदरची सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द झालेच्या दिनांकापासून एक महिन्याचे आत लेखी स्वरुपात आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे - ४११ ०१८ यांचे कार्यालयाकडे पाठवाव्यात.

उक्त प्रस्तावित फेरबदलाबाबत विहीत मुदतीमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकाकडे प्राप्त होणा-या हरकती । सूचना विचारात घेऊन फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजूरीसाठी सादर केला जाईल.

(आशीष शर्मा)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे - १८.

ठिकाण - पिंपरी.
दिनांक - १२।०३।२०१०.

(टिपः सदर सूचना व फेरबदलदर्शक नकाशा पिं.चि.म.न.पा.चे www.pcmcindia.gov.in या वेबसाईट वरही उपलब्ध आहे.)

PIMPRI CHINCHWAD MUNICIPAL CORPORATION,

(Modification under section 37 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966)

NOTICE

No. TPS/WS/2C / 11 /2010.

Whereas, the Revised Development Plan of the Pimpri Chinchwad New Town Development Authority has been sanctioned by the Government of Maharashtra,Urban Development Department, vide Notification No. TPS/ 1893/UD-13, dated 28th November 1995. And the Government of Maharashtra, Urban Development Department, vide Order No. PCM/1697/934/Cr-89/UD-22, dated 25th November 1997, brought the area under the planning control of Pimpri Chinchwad New Town Development Authority under the planning control of Pimpri Chinchwad Municipal Corporation. (hereinafter referred to as the "said Development Plan".)

And whereas, in the said Development Plan the land bearing S.No. 94, 95 & 96 from the village Bhosari which admeasures approximately 8.00 Hectares is included in agricultural zone. ( hereinafter referred to as the "said land")

And whereas, the General Body of Pimpri Chinchwad Municipal Corporation has passed resolutions vide Resolution Nos. 664 & 751 , respectively dated 03.06.2009 & 21.12.2009 to effect modification to change the zone of said land from agricultural zone to residential zone as per the provision laid down under section 37 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.( hereinafter referred to as the "said resolution")

And whereas, Pimpri Chinchwad Municipal Corporation has now decided to initiate the modification as per the said resolution in the said Development Plan so as to include the said land from agricultural zone into residential zone as per the provision under section 37 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as the "said Modification").

And whereas, the plan showing the said modification is kept open for public inspection on all working days during office hours in the office of Deputy Director of Town Planning, Pimpri Chinchwad Municipal Corporation, Pimpri , Pune-411 018.

Any person, who has any suggestion and / or objection to the said modification may communicate the same in writing to the Commissioner, Pimpri Chinchwad Municipal Corporation, Pimpri, Pune-411 018 within a period of one month from the date of publication of this notice in the Maharashtra Government Gazette.

The suggestion and / or objection received to the Pimpri Chinchwad Municipal Corporation regarding the said modification in the prescribed time period will be considered and modification proposal submitted to the Government for sanction.

(Asheesh Sharma)
Commissioner,
Pimpri Chinchwad Municipal Corporation,
Pimpri, Pune-18

Place - Pimpri,
Date-20/01/2010

(Note: The said Notice & modification plan is also available on the website of P.C.M.C. - www.pcmcindia.gov.in )

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल

दर्शक भागनकाशा

पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसूचना क्र. टीपीएस-१८९३ ।१४१३ ।नवि-१३, दि. २८ नोव्हेंबर १९९५ अन्वये मंजूर तथापि प्रस्तुतचे क्षेत्र महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसूचना क्र. पीसीएन-१६९७ ।९३४ ।प्र. क्र. ८९ ।नवि-२२, मंत्रालय, मुंबई दिनांक १५ नोव्हेंबर १९९७ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रण कक्षेत समाविष्ट करण्यात आलेले असून **मा. महापालिका सभा ठराव क्र. ६६४, दिनांक ०३ ।०६ ।२००९** अन्वये मौजे भोसरी येथील स.नं. ९४, ९५, ९६ पैकी जमिन **शेती विभागातून** वगळून **निवासी विभागात** समाविष्ट करण्यास मान्यता दिलेली आहे.

Proposed to be included in Residential zone.




प्रमाण : १:५०००

**खुलासा – (REFERENCE)**

| | |
|---|---|
| ०१) रहिवास – Residential | ०२) वाणिज्य – Commercial |
| ०३) औद्योगिक – Industrial | ०४) औद्योगिक (म.औ.वि.मं.) – Industrial (M.I.D.C.) |
| ०५) सार्वजनिक/निमसार्वजनिक – Public/Semi Public | ०६) उद्यान, बाग, खेळाचे मैदान – Parks, Gardens, Playground |
| ०७) हिरवा पट्टा, हरित विभाग, खुली जागा इ Green belts, Green Zone, Open Space etc. | ०८) शेती – Agricultural |
| ०९) नदी, नाले, तलाव इ. – Water bodies | १०) वाहतूक व दळणवळण – Transport & Communication |
| ११) सार्वजनिक उपयोगाकरीता – Public Utility | १२) विद्यमान रस्ते – Existing Roads |
| १३) नियोजित रस्ते – Proposed Roads | १४) मंजूर विकास योजना आरक्षण Development Plan Reservation |
| १५) नाविकास विभाग (No Development Zone due to Defence restriction) | १६) पिं.चिं.नवनगर विकास प्राधिकरण हद्द – PCNTDA Limits |
| १७) दाट वस्ती क्षेत्र – Congested Area | |

१८) याप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करावयाचा असे.

उपसंचालक
नगर रचना व विकास विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे-१८

आयुक्त
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे- ४११०१८.